



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ६७ * नांदेड * गुरूवार, दि. १२ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# सर्वच बाबतीत महाराष्ट्र देशात पहिला; वेगळा देश असता, तर तिसरी मोठी अर्थव्यवस्था -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने गेल्या दहा वर्षांत घेतलेली भरारी केवळ राज्यासाठीच नव्हे, तर देशासाठी दिशादर्शक ठरली आहे. महाराष्ट्र जर एक वेगळा देश असता, तर तो जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असता, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थव्यवस्थेचे वर्णन केले.



विधानसभेत उत्तर देताना फडणवीस यांनी महाराष्ट्र आता केवळ सिंगापूर किंवा 'युएई'च्या स्पर्धेत नसून, लवकरच त्यांनाही मागे टाकण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले. २०४७ पर्यंत ५ ट्रिलियनचा डॉलर टप्पा सहर पार होईल, असेही त्यांनी म्हटलं आहे. परकीय थेट गुंतवणूक, बिगर-तेल निर्यात, स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स, बँकांतील ठेवी, कर्जवाटप, जीएसटी संकलन आणि वृक्ष आच्छादन या सर्वच बाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र सध्या ६६० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असून, २०३०-३१ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवलं असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्राने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांना मागे टाकले असून, येत्या २-३ वर्षांत आपण 'युएई' आणि सिंगापूरलाही मागे टाकू असे ते म्हणाले.

फडणवीस यांनी सांगितले की, राज्याचे उत्पन्न जर ५१ लाख कोटींनी वाढले असल्याने ९.३२ लाख कोटींचे कर्ज ही चिंतेची बाब नाही. 'कर्ज आणि जीडीपी'चे १८.२ टक्क्यांचे गुणोत्तर हे महाराष्ट्राच्या भक्कम आर्थिक प्रकृतीचे लक्षण आहे. पंजाब आणि केरळसारखी राज्ये जेव्हा ३५ ते ४६ टक्क्यांच्या उंबरठ्यावर आहेत, तेव्हा महाराष्ट्र २५ टक्क्यांच्या मर्यादेत राहूनही विक्रमी विकास दर गाठत आहे. आम्ही केवळ घोषणा करत नाही, तर आर्थिक शिस्त पाळून विकास करतो. 'लाडकी बहीण' सारखी योजना राबवूनही आमची राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या मर्यादेत आहे, हेच आमचे यश आहे, असे फडणवीस म्हणाले.

ते म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या या योजनेसाठी बजेटमध्ये १ हजार कोटी रुपये राखून ठेवले आहेत. या अंतर्गत रस्ते बनवण्यासाठी प्रति किलोमीटर १५ लाख रुपये दिले जाणार असून गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क माफ करण्यात आलं असल्याचे ते म्हणाले.

## जम्मूचे माजी मुख्यमंत्री फारूक अब्दुल्लांवर गोळीबार

**श्रीनगर (प्रतिनिधी)–** जम्मू-कश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते डॉ. फारूक अब्दुल्ला यांच्यावर जम्मूमध्ये गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवानं या हल्ल्यात फारूक अब्दुल्ला थोडक्यात बचावले आहेत. ही घटना जम्मूतील ग्रेटर कैलाश परिसरात घडली. फारूक अब्दुल्ला त्यांच्या परिचयाच्या एका वकिलाच्या मुलाच्या लग्न समारंभाला उपस्थित राहण्यासाठी तिथं गेले होते. त्यावेळी त्यांच्यावर हा हल्ला झाल्याची माहिती आहे.

फारूक अब्दुल्ला यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला सुरक्षा रक्षकांनी पकडलं आहे. कमलसिंह जमवाल असं त्याचं नाव असून पोलिसांनी आता त्याला ताब्यात घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हल्ल्यानंतर आरोपी झुडपांमध्ये लपून बसला होता, मात्र सुरक्षाकर्मचाऱ्यांनी त्याला पकडलं. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेच्या वेळी फारूक अब्दुल्ला यांच्यासोबत जम्मू-कश्मीरचे उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी देखील उपस्थित होते. गोळीबारादरम्यान त्यांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांना तातडीने वैद्यकीय मदत देण्यात आली.

# चालत्या हायवाने घेतला अचानक पेट

## नांदेड-अर्धापूर रोडवर खडकुत पाटीजवळील घटना

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव हद्दीत असलेल्या देशमुख पेट्रोल पंपाच्यासमोर राख वाहतूक करणारा हायवा क्र. एम.पी.०९ एच.एच.४८३२ या हायवाने अचानक पेट घेतला. ही घटना बुधवार, दि. ११ मार्चच्या दुपारी घडली.



या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांच्यासह अग्निशामक दल, महामार्ग पोलीस, रूग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाले होते. आग आटोक्यात येईपर्यंत आगीत सायनाचे कॅबिन पूर्ण जळून खाक झाले आहे. रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही परिणाम होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनाने प्रयत्न केले आहेत. राज्यासह नांदेड जिल्हयात उष्णतेत वाढ झाली आहे. वाहन अचानक पेटण्याच्या घटनेत उन्हाळ्यात जास्त प्रमाणात होताना दिसून येतात. या घटनेने सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता निर्माण झाली असून वाहनधारकांनी काळजी घेणे गरजेचे ठरले आहे.

# महिला महापौरांचा आदर्श पायंडा; शहरामध्ये एकही होर्डिंग्ज न लावता केला वाढदिवस साजरा



**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** शहराच्या प्रथम नागरिक म्हणून महापौर यांच्याकडे पाहिले जाते. पहिल्यांदाच महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर महापौर पदाचा पहिला बहुमान कविता संतोष मुळे यांना मिळाला. त्यांनी सुरुवातीलाच शहराचे विद्रूपीकरण होणार नाही यासाठी कठोर निर्बंध घालण्यात येतील असे नांदेडकरांना आश्वासित केले होते. त्याचाच एक भाग म्हणून स्वतःच्या वाढदिवसाचे एकही शहरात होर्डिंग्ज न लावता साध्या पद्धतीने नांदेडकरांच्या शुभेच्छा स्वीकारून वाढदिवस साजरा केला. महिला महापौर यांचा हा आदर्श पायंडा नांदेडकरांनी अंगीकारावा व शहर विद्रूप होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी 'गोदातीर समाचार' शी बोलताना केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे यांचा दि. ११ मार्च रोजी वाढदिवस होता. वाढदिवसाचे शहरात नको त्या ठिकाणी कटआऊट किंवा होर्डिंग्ज लावून शहर विद्रूप करण्याची मागील काही काळात जणू स्पर्धाच लागली होती. या संदर्भात स्वतः माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनीही खेद व्यक्त करत एकदा तर त्यांनी स्वतःचेच होर्डिंग आपला ताफा थांबवून काढून टाकले होते. त्यानंतर काही प्रमाणात होर्डिंग्ज लावणे कमी झाले होते, परंतु मधल्या काळात पुन्हा एकदा आपल्या लाडक्या नेत्याला खुश करण्यासाठी काही कार्यकर्ते आटापिटा करत नको तिथे होर्डिंग्ज लावून शहराचे विद्रूपीकरण करत होते. महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या ठिकाणी होर्डिंग्ज लावण्यासाठी महापालिकेची संमती आहे, मात्र नेमून दिलेल्या जागेशिवाय इतरत्र होर्डिंग्ज लावल्यास त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल अशा सूचना महापौर कविता मुळे यांनी आपल्या पहिल्याच बैठकीत महापालिका अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

योगायोगाने त्यांच्या स्वतःच्याच वाढदिवसाच्या निमित्ताने काही कार्यकर्त्यांनी होर्डिंग्ज लावण्यासाठी त्यांच्याकडे आग्रह धरला, मात्र त्यांनी कार्यकर्त्यांचा आग्रह मान्य केला नाही आणि अखेर आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून नांदेडकरांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. नांदेडकरांच्या सेवेमध्ये मी कुठेही कमी पडणार नाही असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. शंभर दिवस कार्यक्रमाच्या उपक्रमांतर्गत नांदेड शहर होर्डिंग्जमुक्त करण्याचा एक भाग होता. त्यानुसार मी माझ्या वाढदिवसाचे शहरात कुठेही होर्डिंग्ज लावले नाही. हाच आदर्श अन्य कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी घ्यावा असे आवाहनही कविता मुळे यांनी केले आहे.

# जागतिक वारसा ठरलेल्या मराठा किल्ल्यांच्या जतनासाठी खा. अशोकराव चव्हाण यांची कृती आराखड्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा साम्राज्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झालेला समावेश हा संपूर्ण देशासाठी आणि विशेषतः महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी सरकारने आता विशेष निधीची तरतूद करून व्यापक संवर्धन योजना राबवावी, अशी मागणी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी संसदेत केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रातील ११ तर तामिळनाडूतील एका मराठा किल्ल्याला नुकताच जागतिक वारसाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राज्यसभेत 'विशेष उल्लेख'च्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित करताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली वारशाचे प्रतीक असलेले रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग आणि शिवनेरी यांसारखे किल्ले हे केवळ दगडांच्या भिंती नसून ते १७ व्या शतकातील भारताच्या लष्करी वास्तुकलेचे, सागरी शक्तीचे आणि प्रशासकीय दूरदृष्टीचे जिवंत पुरावे आहेत.

हा अमूल्य वारसा जतन करणे हे आपले कर्तव्य असून, या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र आणि पुरेशा आर्थिक निधीचे वाटप करणे, पुरातत्व शास्त्राचा आधार घेऊन शास्त्रीय पद्धतीने किल्ल्यांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन व्हावे, किल्ल्यांचा इतिहास आणि वास्तुकलेचे डिजिटल स्वरूपात जतन करावे, किल्ल्यांवर वारसा पर्यटन विकसित करून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

मराठा किल्ले ऐतिहासिकदृष्ट्या तर महत्त्वाचे आहेतच, शिवाय स्थानिक समुदायांसाठी शाश्वत रोजगार निर्माण करण्याची मोठी क्षमता त्यात आहे. या वारशाचे रूपांतर 'सांस्कृतिक अभिमान आणि आर्थिक संधी' अशा एकात्मिक मॉडेलमध्ये करण्याची आवश्यकता त्यांनी विषद केली.

## मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव येणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** विरोधी पक्षांकडून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत चर्चा सुरु आहे. ही चर्चा सुरु असतानाच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसनं मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्तावासाठी पुढाकार घेतला आहे.

# घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही -केंद्रीयमंत्री मोहोळ

**पुणे (प्रतिनिधी)–** देशात सुरू असलेल्या घरगुती गॅसच्या तुटवड्यांसदर्भात भारत सरकारने १०० टक्के काळजी घेतली आहे. देशभरात व्यावसायिक गॅस दिला जातो, तो थांबवला आहे आणि कमी केलाय. घरगुती गॅस म्हणून प्राधान्य दिल जात आहे, घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही याची काळजी सरकार घेत आहे. त्यामुळे, याची चिंता करण्याचं कारण नाही, असे केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे.

गॅस एजन्सीकडून काळाबाजार होत असल्याच्या गोष्टी कानावर येत आहेत, त्याची दखल घेतली जाईल. घरगुती गॅस कुठेही कमी पडणार नाही याची काळजी सरकार घेत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे आपल्याला हा निर्णय घ्यावा लागला. त्यासाठी, काही काळ जावा लागेल. मात्र, घरगुती गॅस कमी पडणार नाही, असेही मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट केले.


# स्वीकृत सदस्य पदासाठी सेवानिवृत्त मनपा उपायुक्तांचे अर्ज

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेची सत्ता ही भाजपच्या हाती आल्याने अनेक इच्छुकांनी नामनिर्देशित सदस्य (स्वीकृत) पदासाठी आपापल्या स्तरावरून मागणी सुरू केली आहे. ६० हून अधिक जणांनी वेगवेगळ्या पक्षांकडून सदस्य पदाची मागणी केली असून त्यात महापालिकेतून नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या दोन अधिकाऱ्यांचाही त्यात समावेश आहे.




नांदेड वाघाळा महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ही १६ मार्च रोजी होणार आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये स्वीकृत सदस्यांसह महिला बालकल्याण आणि स्थायी समिती सदस्यांचीही वर्णी लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भाजप- शिवसेना, वंचित बहुजन आघाडी- काँग्रेस आणि एमआयएम या पक्षांनी स्वीकृत सदस्यांसाठी आपल्या उमेदवारांचे नाव जवळपास निश्चित केले असले तरी त्याचा उलगडा अद्याप करण्यात आला नाही. भारतीय जनता पक्षाकडून व अन्य पक्षाकडून कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

यात भर म्हणून याच महापालिकेतून नुकतेच सेवानिवृत्त झालेले उपायुक्त संजय जाधव आणि विलास भोसीकर यांनीही नामनिर्देशित सदस्य म्हणून संधी मिळावी, यासाठी महापालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. स्वीकृत सदस्यांनी १३ मार्चपर्यंत महापालिकेकडे अर्ज दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवड चाचणीनंतर त्या त्या पक्षाच्या उमेदवारांना संधी देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.




## कुणबी प्रमाणपत्र मिळवून द्या, अन्यथा २०२९ मध्ये आम्ही तुम्हाला पाडणार, जरांगेंचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणासंदर्भात सरकारनं मराठवाड्यासाठी जीआर काढला आहे. आता कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. प्रमाणपत्र मिळवून द्या, अन्यथा २०२९ मध्ये पराभवाचा सामना करा, असा इशारा देखील जरांगे पाटील यांनी आमदारांना दिला.

राज्य सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात मराठवाड्यासाठी जीआर काढला आहे. त्यामुळं कुणबी प्रमाणपत्र मिळवून देण्याची जबाबदारी ही सरकारचीच असल्याचे सांगत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. कुणबी प्रमाणपत्र मिळत नसेल तर मराठवाड्यातील मराठा समाजाने उद्यापासून आपल्या भागातील आमदारांना प्रमाणपत्र का मिळत नाही? याबाबत जाब विचारावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# अर्धापूर परिसरात अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू; गुन्हा दाखल



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वर बुधवारी मध्यरात्री एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दीड वर्षीय बिबट्याचा मृत्यू झाला. ही घटना शेनी फाट्याजवळ घडली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय महामार्गावरून दि. ११ मार्च रोजी मध्यरात्री १२:४५ वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. सदर बिबट्या महामार्ग ओलांडत असताना नांदेडकडून वारंगाकडे जाणाऱ्या एका सुसाट अज्ञात वाहनाने त्याला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बिबट्याच्या तोंडाला आणि डोक्याला गंभीर इजा होऊन झाली. यात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. उपवनसंरक्षक नांदेड केशव वाबळे यांच्या उपस्थितीत सहाय्यक वनसंरक्षक भरत खेलबाडे, नांदेड वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. अनिल रासने, मानद वन्यजीव रक्षक अतिंद्र कट्टी यांच्यासह वनपाल यु.यु. मोकले, डी.ए. हक्कदळे, वनरक्षक एल.एन. शेळके व आरआरक्यू टीमने पंचनामा केला. या प्रकरणी वनगुन्हा क्र. ०१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत बिबट्याला ताब्यात घेऊन टीटीसी भोकर येथे नेण्यात आले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर.व्ही. सुरेवाड, डॉ. संजय शेळके, डॉ.अविनाश बुन्नावार यांनी शवविच्छेदन केले. त्यानंतर नियमानुसार बिबट्यावर दहन करून अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वनपाल ज्ञानेश्वर धोंडगे, सिध्दार्थ सोनकांबळे व पिलाजी चालक गुलाब जाधव उपस्थित होते.

# २८ मार्चपासून आयपीएल सामने

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट चाहत्यांचा उत्साह टी २० वर्ल्ड कपच्या विजेतेपदामुळं शिगेला पोहोचलेला आहे. याच दरम्यान आयपीएलच्या पहिल्या सामन्याची तारीख सर्वप्रथम जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार आयपीएल २८ मार्चपासून सुरु होणार आहे. बीसीसीआयनं बुधवारी आयपीएलच्या पहिल्या १६ दिवसांमधील २० सामन्यांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. मुंबई इंडियन्स या २० पैकी चार सामने खेळणार आहे. मुंबईचा पहिला सामना २९ मार्चला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध होणार आहे.

आयपीएलच्या १९ व्या पर्वाला २८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. हार्दिक पांड्या नेतृत्त्वात आणि रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव या सारख्या दिग्गज खेळाडूंचा भरणा असलेल्या मुंबईला यंदा आयपीएलच्या मोहिमेची सुरुवात करत असताना पहिलं आव्हानं कोलकाता नाईट रायडर्सचं असेल. हा सामना २९ मार्चला सायंकाळी ७.३० वाजता सुरु होईल. मुंबईचा हा सामना वानखेडे स्टेडियमवर होईल.

मुंबई इंडियन्सचा दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध दिल्लीत होईल. हा सामना ४ एप्रिलला होणार आहे. यानंतर राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना गुवाहाटीत होईल. हा सामना ७ एप्रिलला होईल. यानंतर चौथ्या सामन्यासाठी मुंबई इंडियन्सचा संघ मुंबईत दाखल होईल. मुंबईत हार्दिक पांड्याच्या संघाचा सामना गतविजेत्या आरसीबीसोबत होणार आहे. हा सामना १२ एप्रिलला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होईल. या सामन्याची मुंबईच्या चाहत्यांना मोठी उत्सुकता असेल. कारण या सामन्यात रोहित शर्मा मुंबईकडून मैदानात असेल तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून विराट कोहली मैदानात असेल. क्रिकेट चाहत्यांसाठी मुंबई आणि बंगळुरु यांच्यातील सामना पर्वणीच ठरणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# कामाचे तास आणि उत्पादकता

काही कॉर्पोरेट नेत्यांनी जाहीरपणे लांब कामाच्या तासांचे समर्थन केल्यामुळे भारतात खाजगी जीवन अर्थात वैयक्तिक जीवन समतोलाच्या मुद्द्यावर मोठा वाद निर्माण झाला आहे. २०२३ मध्ये इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांनी ७० तासांचा कामाचा आठवडा उत्कृष्टतेसाठी योग्य असल्याचे सांगितले होते. त्यानंतर लार्सन अँड टुब्रो या भारतातील प्रमुख कंपनीच्या अध्यक्षांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यात ९० तास काम करण्याचा, तसेच सुट्टीचा त्याग करण्याचा सल्ला दिला. सर्वच कॉर्पोरेट नेते या मताचे समर्थन करत नाहीत. काहीजण कामाच्या तासांवरून लक्ष केंद्रित करून त्या तासांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची असल्याचे सांगतात. तर काहीजण काम आणि विश्रांती यामध्ये आरोग्यदायी संतुलन राखण्याची गरज व्यक्त करतात. भारतातील अभ्यास असे सूचित करतात की, जास्त तास काम करणे म्हणजे अधिक उत्पादनक्षमता आणि यश, हा गैरसमज आहे. यामुळे कर्मचारी कल्याण, शारीरिक आणि मानसिक आरोग्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि दीर्घकालीन टिकाव याकडे दुर्लक्ष होते. भारतीय कायदा दररोज ९ तास आणि आठवड्यात ४८ तास काम करण्याची मर्यादा घालतो. मात्र, करार पद्धतीमुळे अनेक कामगार हे संरक्षण मिळवू शकत नाहीत. सप्टेंबर २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार, भारतीय कामगार जगातील सर्वाधिक ओव्हरवर्क केलेल्या कर्मचाऱ्यां-मध्ये मोडतात. भारतीय सरासरी आठवड्यात ४६.७ तास काम करतात, तर विकसित आणि युरोपीय देशांतील कर्मचारी ४० तासांपेक्षा कमी काम करतात. बहुतांश कर्मचारी, विशेषतः बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांची परिस्थिती फारशी वेगळी नाही. 'वर्क फ्रॉम होम'मुळे कामाच्या तासांच्या परिभाषेत आणखी गडबड झाली आहे. २०२४ मध्ये पुण्यात एका २६ वर्षीय कर्मचाऱ्याचा कामाच्या ताणामुळे मृत्यू झाल्याची घटना यासाठी उदाहरण ठरते. अनेक माजी कर्मचाऱ्यांनी कंपन्यांमध्ये भोगलेल्या त्रासदायक अनुभवांवर भाष्य करत, कॉर्पोरेट क्षेत्रातील वैयक्तिक जीवन समतोलावर व्यापक चर्चा घडवून आणली. हा फक्त भारतीय मुद्दा नाही. अनेक आशियाई देशांमध्ये ओव्हरवर्क करण्याला प्रतिष्ठा मिळते, पण यामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याची हानी होते. सिंगापूर आणि हाँगकाँग-मधील अलीकडच्या सर्वेक्षणांमध्ये निम्म्याहून अधिक कर्मचारी मानसिक व शारीरिकदृष्ट्या थकलेले असल्याचे आढळले. चीनमधील 'मिलिटरी स्टाईल' कामाच्या ७२ तासांच्या संस्कृतीला पाश्चात्त्य प्रसार-माध्यमांनी रक्तपिपासू म्हणून संबोधले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, आठवड्यात ५५ तासांपेक्षा जास्त काम केल्यास हृदयविकाराचा धोका ३५% ने वाढतो, तर हृदयरोगामुळे मृत्यूचा धोका १७% ने वाढतो. जास्त तास काम केल्याने भारताच्या उत्पादनक्षमता आणि आर्थिक प्रगतीत भर पडेल, हा दावा कोणत्याही वैज्ञानिक आधारावर आधारित नाही. कामाच्या जास्त तासांचा आग्रह हा केवळ कर्मचारी कल्याणाला हानी पोहचवतो असे नाही, तर तो उत्पादकतेवरही विपरीत परिणाम करतो. आरोग्य, मानसिक शांतता, आणि कौटुंबिक जीवन संतुलित ठेवल्याशिवाय दीर्घकालीन यश मिळवणे कठीण आहे. युरोपसारख्या देशांमध्ये कमी तास काम करूनही उच्च उत्पादनक्षमता राखली जाते, हे भारताने ध्यानात घ्यायला हवे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्राने कामाच्या गुणवत्तेला महत्त्व देणे आणि कर्मचाऱ्यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे. यामुळे केवळ उत्पादकता वाढेल असे नाही, तर कर्मचारी दीर्घकाळ कंपनीशी जोडले जातील. भारतीय कामगारांवरील ताण कमी करण्यासाठी, किमान कामाच्या तासांची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. कामाच्या तासांवर आधारित मूल्यांकन न करता, त्याच्या गुणवत्तेवर भर दिला गेला पाहिजे. कामाच्या वेळेचे व्यवस्थापन सुधारूनच, भारत जागतिक स्तरावर उत्पादनक्षम व शाश्वत अर्थव्यवस्था होऊ शकतो. कामाच्या तासांमध्ये संतुलन राखणे म्हणजे केवळ व्यक्तीचे आरोग्य व कुटुंबासाठीच नव्हे, तर देशाच्या शाश्वत प्रगतीसाठीही महत्त्वाचे आहे. म्हणूनच, काम-जीवन समतोल राखणे हे प्रत्येक क्षेत्राचे आणि नेत्याचे प्राथमिक उद्दिष्ट असायला हवे.

# यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

१२ मार्च हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, दूरदर्शी नेते, कुशल प्रशासक आणि लोकाभिमुख विचारवंत म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी केली जाते. महाराष्ट्राच्या घडणीत ज्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे अशा या नेत्याचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते; तर शिक्षण, सहकार, उद्योग, संस्कृती, साहित्य, संरक्षण व्यवस्था, ग्रामीण विकास आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीपर्यंत त्यांचा प्रभाव व्यापक होता. यशवंतराव चव्हाण हे केवळ एका राज्याचे मुख्यमंत्री किंवा देशाचे संरक्षणमंत्री नव्हते, तर ते एक व्यापक दृष्टी असलेले राष्ट्रनेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दूरदृष्टी, प्रगल्भता, व्यवहारज्ञान, समन्वयाची वृत्ती आणि लोकहिताची प्रामाणिक बांधिलकी यांचा सुंदर संगम दिसून येतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय इतिहासात त्यांचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाते.



यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी त्यांच्या आजोळी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावात एका सामान्य कुटुंबात झाला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर देवराष्ट्रे हे गाव सांगली जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण तर आईचे नाव विठाबाई होते. यशवंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि घराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या आईवर आली. विठाबाई या अत्यंत कष्टाळू, स्वाभिमानी आणि दूरदर्शी स्त्री होत्या. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलाच्या शिक्षणासाठी अथक प्रयत्न केले. आईच्या संस्कारांचा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम झाला. आईकडून त्यांना परिश्रम, प्रामाणिकपणा, स्वाभिमान आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या यशवंतरावांना बालपणापासूनच शेतकरी आणि सामान्य लोकांच्या समस्या जवळून पाहायला मिळाल्या. त्यामुळे पुढे राजकारणात आल्यावर त्यांनी ग्रामीण विकासाला विशेष प्राधान्य दिले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले. पुढे त्यांनी कोल्हापूर आणि पुणे येथे उच्च शिक्षण घेतले. शिक्षणाच्या काळातच त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडू लागला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू यांसारख्या राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणामुळे त्यांच्यात देशभक्तीची भावना जागृत झाली. त्यामुळे त्यांनी विद्यार्थी अवस्थेतच स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. तुरुंगवासाच्या काळात त्यांनी अनेक राष्ट्रीय नेत्यांच्या सहवासातून राजकारण, समाजकारण आणि राष्ट्रनिर्मितीचे धडे घेतले. याच काळात त्यांची विचारसरणी अधिक प्रगल्भ झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय काम सुरू केले. त्यांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या पुनर्निर्माणाच्या प्रक्रियेत त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. १९५० च्या दशकात ते महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे नेते म्हणून उदयास आले. त्यांची कार्यक्षमता, संघटन कौशल्य आणि समन्वयाची क्षमता पाहून त्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या. १९५६ मध्ये ते द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्या काळात राज्यात मराठी आणि गुजराती भाषिक लोकांमध्ये वेगळ्या राज्याच्या मागणीवरून आंदोलन सुरू होते. या अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीत त्यांनी संयम, समन्वय आणि दूरदृष्टी दाखवून परिस्थिती हाताळली.

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या घडणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, सहकार, उद्योग, शेती, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास यावर विशेष भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सहकार चळवळीला मोठी चालना मिळाली. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी दूध संघ यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा हा त्यामागचा मूलभूत उद्देश होता. आज महाराष्ट्र सहकार क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखला जातो, त्यामागे यशवंतराव चव्हाण यांचे दूरदर्शी नेतृत्व मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे.

शिक्षण क्षेत्रातही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता यावर भर दिला. त्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था उभारल्या गेल्या. आज महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राची भक्कम पायाभरणी ही त्यांच्या दूरदर्शी धोरणांमुळे झाल्याचे मानले जाते.

कृषी आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, सिंचन सुविधा वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रोत्साहित करणे यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण भागात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा आणि शिक्षण सुविधा वाढवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांच्या धोरणांमुळे ग्रामीण महाराष्ट्रात विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.

यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय पातळीवरील योगदानही अत्यंत महत्त्वाचे आहे. १९६२ साली भारत-चीन युद्धानंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्या अत्यंत कठीण काळात त्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. त्यांनी भारतीय सैन्याचे पुनर्रचना, आधुनिकीकरण आणि बळकटीकरण यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या नेतृत्वाखाली संरक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे भारतीय सैन्य अधिक सक्षम आणि सक्षम बनले. त्यांच्या कार्यामुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले.

पुढे त्यांनी वित्तमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि गृहमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. प्रत्येक पदावर त्यांनी प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने काम केले. राष्ट्रीय एकात्मता, आर्थिक विकास आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. ते अत्यंत अभ्यासू आणि विचारशील नेते होते. कोणताही निर्णय घेताना ते विविध पैलूंचा सखोल विचार करत असत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वावर सर्वच स्तरांतील लोकांचा विश्वास होता.

यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व समन्वयवादी आणि लोकाभिमुख होते. विविध मतप्रवाह आणि विचारसरणी असलेल्या लोकांना एकत्र आणून सामूहिक निर्णय घेण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. ते संवादावर विश्वास ठेवणारे नेते होते. मतभेद असले तरी संवादातून मार्ग काढण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटणारे नेता बनले.

आजच्या काळात त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रासंगिकता अधिक जाणवते. सामाजिक समता, ग्रामीण विकास, शिक्षणाचा प्रसार, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि राष्ट्रीय एकात्मता या बाबी आजही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यातून या मूल्यांचे जतन आणि संवर्धन केले. त्यामुळे त्यांचे जीवन आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते.

१२ मार्च रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या कार्याची आणि विचारांची आठवण काढतो. त्यांच्या जीवनातून आपल्याला कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, लोकसेवा आणि राष्ट्रभक्ती यांचे धडे मिळतात. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टी, समन्वय आणि लोकहिताची बांधिलकी आवश्यक असते, हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते.

आज महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीकडे पाहिले असता यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची जाणीव प्रकर्षाने होते. सहकार चळवळ, शिक्षणाचा प्रसार, औद्योगिक विकास, सांस्कृतिक समृद्धी आणि लोकशाही मूल्यांची जपणूक या सर्व क्षेत्रांत त्यांनी घातलेली पायाभरणी आजही महाराष्ट्राच्या विकासाचा मजबूत आधार आहे.

म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असे संबोधले जाते. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वगुणांनी महाराष्ट्राला विकासाच्या नव्या मार्गावर नेले. त्यांचे जीवन आणि कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून ते आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजाच्या प्रगतीसाठी आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे.

अशा या महान नेत्याच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन करूनच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# संस्काराविन सर्व काही व्यर्थ



कोणी म्हणतात की, आज कलियुग आहे आणि या कलियुगात स्वर्गप्राप्ती होत नाही. तसं पाहिल्यास त्यांचं ते समजणंही अगदी बरोबरच आहे. कारण आजच्या काळात ज्या लोकांना आपण मदत करतो तो व्यक्ती पुढं आपल्याला मदत करेलच हे काही सांगता येत नाही. आजचा काळ असा आहे की, पिता पुत्राला ओळखत नाही आणि पुत्र पित्याला. तशीच आई आपल्या लेकराला ओळखत नाही आणि लेकरू आपल्या आईला. आजचं लेकरू मोठं झालं की, बस चक्क मी माझी पत्नी व माझी मुले असे समजून मायबापाच्या गळ्याला फाशीचा फंदा लावत असतो. अर्थात वृद्धाश्रमात टाकत असतो.

मुले आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात टाकतात. त्याचं कारण आहे, त्यांचे आजच्या काळात मुलांवर होत असलेले संस्कार. आजच्या काळातील मायबाप बनलेली तरुणमंडळी आपल्या लहानशा बाळांसमोर आपल्या मायबापांना वृद्धाश्रमात टाकत असतात. हेच पाहात असतात लहानशी मुलं. तेच संस्कार होतात त्यांचेवर. मग तिही लहानाची मोठी होतात. मग विचार करतात. विचार करतात की, माझ्या या मायबापानं माझ्या आजोबाला वृद्धाश्रमात टाकलं होतं. शिवाय ते जेव्हा घरी होते, तेव्हा अत्याचारही केला होता. आपणही तसंच करावं. जेणेकरुन त्यांना पूर्वाश्रमीच्या कर्तृत्वाची शिक्षा तर होईल. ते मग तसंच करतात. तेच नर्क असतं त्यांच्यासाठी.

स्वर्ग नरकाच्या कल्पना पूर्वीच्या ग्रंथात वेगवेगळ्या होत्या. त्या काळात सरळ सरळ व्यक्ती स्वर्गात जात असे. काही जण नरकात जात असत. म्हटलं जातं की पांडवांच्या सेनेचं नेतृत्व करणारा युधिष्ठिर स्वर्गात गेला आणि बाकीचे पांडव द्रौपदीला स्वर्गात गेले नाहीत. कारण काय असावं? यावर काही लोकं नक्कीच म्हणतात की, युधिष्ठिर तर नेतृत्त्व करीत होता. त्याच्याच नेतृत्वात कित्येक निरपराध सैन्य मृत्युमुखी पडले होते. मग तो कसा काय स्वर्गात गेला? परंतु तो स्वर्गातच गेला असेल. याचं कारण होतं की, तो सात्त्विक पुरुष होता. त्याचे विचार चांगले होते. कोणत्याही गोष्टीचा त्याला लोभ नव्हता, ना त्याला रागही येत होता. तसाच तो सर्व प्रकारच्या षडरिपूपासून दूर होता.

स्वर्गारोहनाची जेव्हा वेळ आली, तेव्हा द्रौपदीसह सर्व जायला निघाले स्वर्गारोहनाला. त्यावेळेस सर्वात प्रथम द्रौपदी पडली. तेव्हा भीमानं युधिष्ठिरला विचारलं, बंधू, ही स्वर्गात का आली नाही? त्यावर युधिष्ठिराचं उत्तर होतं की, तिनं अर्जून सोडून सर्व पांडवांना धोक्यात ठेवलं. ती अर्जुनावरच जास्त प्रेम करीत होती. तिच्या मनात अर्जुनाबद्दल गर्व होता. जरी बाकीचे पांडव शक्तीशाली होते तरीही. परंतु तिला जेव्हा भीमानं पकडलं, तेव्हा ती म्हणाली की, मला जास्त भीमच आवडत होता व त्यानंच माझ्यासाठी सर्वकाही केलं. दुःशासनाची छाती फाडून रक्त प्राशन केलं व त्याचं रक्त माझ्या केसांना लावलं. शिवाय त्यानं दुर्योधनालाही मारलं व माझ्या अपमानाचा बदला घेतला. एवढंच नाही तर त्यानं किचकवधही केला. त्यानं माझा अपमान केला म्हणून. मी तर सांगते की पुढील जन्मात मी त्याचीच पत्नी बनेल अशी इच्छा व्यक्त करते.

द्रौपदीनं पुष्टी केली आणि ती गतप्राण झाली. त्यानंतर नकुल पडल्यावर युधिष्ठिर म्हणाला की त्याला सुंदरतेचा गर्व झाला होता. सहदेव पडल्यावर त्याला विद्वत्तेचा गर्व झाला होता असं युधिष्ठिराचं उत्तर. त्यानंतर अर्जून पडल्यावर त्याला त्याच्या धनुर्विद्येचा गर्व झाला होता. असं युधिष्ठिर म्हणतात. सर्वात शेवटी भीम पडल्यावर तो विचारतो की मला तर कोणताच गर्व नाही. मग मी कसा पडलो? त्यावर युधिष्ठिर म्हणतात की तुलाही हजार हत्ती एवढं बळ होतं. त्याचा तुलाही गर्व होताच तर...शिवाय तूच जास्त खात असल्यानं तुलाच जास्त ताकद आहे असं तुला वाटायचं. याचाच अर्थ असा की ज्या लोकांना गर्व असेल. मग तो गर्व कोणत्याही गोष्टीचा का असेना, तो स्वर्गात जात नाही असं युधिष्ठिराचं म्हणणं. शिवाय स्वर्गात जाण्यासाठी चांगले विचारसरणीही असणे गरजेचे आहे. तेही अगदी खरंच आहे.

आज असा गर्व बऱ्याच जणांना झालेला दिसतो. कोणाला मालमत्तेचा गर्व, कोणाला, पैशाचा गर्व, कोणाला सौंदर्याचा गर्व, कोणाला शिक्षणाचा गर्व, कोणाचा त्यांच्या मुलाबाळाचा गर्व, कोणाला त्याच्या उंच इमारतीचा गर्व, कोणाला त्याच्या श्रीमंतीचा गर्व. याचाच अर्थ असा की आज कोणताही व्यक्ती गर्व केल्याशिवाय सुटत नाही. मग तो स्वर्गात कसा जाईल बरं? आजचं स्वर्ग व नर्क इथंच आहे. व्यक्तींना त्यांच्या मुलांच्या तरुणपणात चांगली वागणूक मिळत असेल व त्या मुलाच्या मायबापाजवळच मुलं त्यांच्या मरणापर्यंत राहात असतील, तर ते स्वर्ग असतं आणि चांगली वागणूक मुलं देत नसतील, त्यांना वृद्धाश्रमात टाकत असतील, तर ते नर्क असतं.

आज अशीच अवस्था आहे स्वर्ग अन् नर्काची. कारण आज स्वर्गात कोणी जात नाही आणि कोणीही नर्कात गेलेला दिसला नाही. म्हणूनच चांगले कर्म करावे की जे चांगले कर्म आपली मुलं लहानपणी पाहात असतात. त्यांच्यावर त्या बालवयात संस्कार होत असतात. ते संस्कार मिटवले जात नाहीत. जर आपण त्याच बालवयात त्यांना काय कळते म्हणून आपल्याच मायबापांना वृद्धाश्रमात टाकत गेलो तर ते पुढे जावून आपल्या म्हातारपणात आपल्यालाही वृद्धाश्रमात टाकत असतात. मग आपण कितीही आपली वाचाळ वाणी चांगली बोललो त्या काळात तरी, पुर्वाश्रमीचे आपले वागणे आपल्या कर्म स्वरुपात आपल्याला वाईट दिवस दाखवत असतात हे तेवढंच खरं आहे.

महत्वपूर्ण बाब ही की आपलं म्हातार-पणातील आयुष्य चांगलं जाणं म्हणजे आपलं स्वर्गारोहण व आपला स्वर्गच आणि म्हातारपणातील आयुष्य चांगलं न जाणं म्हणजे आपला नर्कच होय. जर आपणही युधिष्ठिर सोडता इतर पांडवांसारखं गर्व करीत असू आणि मायबापाची सेवा करीत नसू तर आपल्याही म्हातारपणात नर्कच मिळेल, स्वर्ग मिळणारच नाही आणि स्वर्ग जर हवा असेल तर आपण कोणत्याही स्वरुपाचा गर्व करु नये. चांगले विचार ठेवावेत. चांगले वर्तन ठेवावेत. राग करु नये. लोभ करु नये. तसेच एकंदरीत सांगायचं झाल्यास आपण स्वतःला पुर्णतः षडरिपूपासून दूर ठेवावे. तसेच आपले कर्महीी चांगलेच असावे. तरंच आपल्याला याही कलियुगात स्वर्गप्राप्ती होईल यात तिळमात्र शंका नसून हीच सत्य बाब आहे हेही तेवढंच खरं आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# सामाजिक समस्यांवर चर्चा होणे आवश्यक...

मुर्खाच्या आवेशात
वेश काय बदलता
तुमचे ते वर्तन नव्हे
शहाणे समजत होतो
उगाच म्हणत होतो.
तुम्ही तर त्यातलेच
एवढे आतले वाटले नव्हते
दुष्काळी सदा-
सुकाळी कधीच नव्हते.

या पंक्ती उगाच सुचल्या म्हणून नाहीत तर समाजातला एक मोठा आकडा असाच आहे ज्यांना चुका काढण्यात आणि त्या आवर्जून सर्वांपुढे दाखवण्याची भारी हौस असते. चूक असेल तर सांगावी; आणि तीही खाजगीत, सार्वजनिक माहौल करण्यात कसली आली मजा! इथे तिथे कायम 'उठ हशा' करण्यात जिंदगी संपत आहे याची जाणीव संपता संपता तरी व्हायलाच हवी.

चांगली माणसे आणि चांगली कर्मे सध्या दुर्मिळ होत असण्याचे मुळात कारण हेच आहे. कारण कौतुक म्हणून काही नाही तर नाहीच त्याशिवाय काटेरी कुंपणात काटे खुपसणारेच जास्त होवू पाहत आहेत. आपले दुःख ते आपले आणि आपले सख्ये ते पक्के! बाकीच्यांचे काय? सगळी मोजणी उघड्यावरच आणखी किती दिवस आणि का म्हणून करायची? बरं,काही उसनवारी पण नाही फेडत बसायला. चांगुलपणाचा टेंबा मिरवायचा आहे म्हणून चांगल्याचाच जीव घेणे हे किती योग्य आहे? अयोग्याला योग्य म्हणण्यात काही अर्थ तर नाहीच शिवाय स्वतःच मिशी ताणून व फुटलेले पोट आणखी फुगवून आपलीच मर्दुमकी गाजवात बसायची. चांगल्यात एक दुर्गुण असतो; की तो खूप चांगला असतो. त्याचा फायदा ही सो कॉल्ड जमात घेताना दिसत आहे. तुम्ही दारू पिवून रस्त्यावर लोळा, तुम्हाला कोणी काहीच म्हणणार नाही.

तुम्ही पाकीट मारा की डाका टाका- तुमच्याकडे लक्ष पण देणार नाही. कारण ही लक्ष्याधिष्टीत म्हणवली गेलेली माणसे याकडे लक्ष देणारी नसतात; कारण ती चांगली नसतात. अशा लोकांच्या वाट्याला जाण्यापेक्षा त्यांची वाट सुकर करणारे भरपूर आहेत आणि ते करत असताना दुर्गुणपणा आपण झाकतोय याची लाज अजिबात कोणालाही वाटत नाही. पण चांगल्यात लाथा मारून पाणी काढल्यागत आव आणणारे कित्येक आहेत.

नियमांवर बोट ठेवून पण कामे सध्या भरपूर होत आहेत. तरीसुद्धा हे भरपूर नियम काहीनांच लागू आहेत. आपली बिशाद जर खरेच कठोर असेल तर कठोर हवीच पण नियम म्हणजे सर्वांना सारखे व सर्वांना लागू तसे तुम्हीही लावून घ्या. नाहीतर लावून-लावून चांगल्यांनाच खायचं आणि दुसऱ्यांना मात्र ओसरीपर्यंत पसरू द्यायचं, हे काही बरोबर नाही.

जग सुधारविणारे आधीही होते आणि आताही आहेत. रोखणारे पण आधीही होते आणि.. पण, हे काही थांबले नाही. मग जिथे चवीला तुम्ही तिखटही होऊ शकत नाही तिथं बेचव तरी कशाला करताय. कोणाला टोमणा म्हणून लिहिणे नाही तर कोणाला काहीतरी बरे दिसत नाही म्हणून लिहिणे. आपल्याने बदल होत असेल तर करावा. तो तुमच्या दृष्टीने चांगलाच असेल पण आपले अनुयायी किती? हे पाहून करावा. नाहीतर चारजण मागे म्हणून हजारोच्या नेतृत्वाला टशन देत बसू नाही.

स्तुत्य काम करणारे करत राहणार; कारण त्यांच्यात पण एक किडा आहे चांगले काम करण्याचा. तो मरत तर नाहीच पण जगत असताना सरत तर कसाच नाही. तिथे आपली हालचाल ही व्यर्थ घालण्यापेक्षा शरीराच्या हालचालीत (व्यायायामात) घातली तर उत्तमच. शरीर सुदृढ व्हावे म्हणून तर अजिबात नाही तर रक्ताभिसरण सुधारून बुद्धी तल्लख व्हावी म्हणून! कारण नाही म्हणले तरी मनाच्या जवळ मेंदूच असतो. इथल्या गाठी आडकाठी आणत असताना आपण स्वस्थ बसूच नये. बाकी समजणारे समजतील आणि न समजणारे पसरतील.

वसा हा वसाच असतो
तो असा तसा नसतो
डोंगर आडवे करणारे
पसरट्यांना पसरत नाहीत.
पाणी खूप आतवर आहे आपल्या
तिथे वर-
वरवरच्यानांना दिसत नाही

**- अमोल भारती,**
नांदेड
मो.८८०६७२१२०६

# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी

## जिल्हा दक्षता पथकाची बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ (पीसीपीएनडीटी) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करत बेकायदेशीर गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कडक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ (पीसीपीएनडीटी) ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर स्थापन दक्षता पथकाची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात ९ मार्च रोजी पार पडली.

या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, मनपा नांदेडचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त, जिल्हा रुग्णालय नांदेडचे निवासी वैद्यकीय अधिकारी, पीसीपीएनडीटी विधी समुपदेशक तसेच समितीचे अशासकीय सदस्य डॉ. किशोर अतनूरकर व डॉ. शोभा वाघमारे उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील विविध समुचित प्राधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेऊन पीसीपीएनडीटी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, संबंधित विभागांमध्ये समन्वय राखणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी जनजागृती करणे तसेच प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य सचिव डॉ. संजय पेरके यांनी जिल्ह्यातील व तालुक्यातील सोनोग्राफी केंद्रे तसेच एमटीपी केंद्रांच्या नोंदणी व नुतनीकरणाचा आढावा सादर केला. तसेच जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती व समुचित प्राधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा मांडला. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सामाजिक संस्थांच्या सहभागातून प्रबोधनात्मक जनजागृती होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अवैधरित्या होणाऱ्या गर्भपातास आळा घालण्यासाठी अन्न व औषधी प्रशासन विभागामार्फत ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले. तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या खबरी योजनेअंतर्गत गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी, गर्भलिंग निदान प्रतिबंध आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी गर्भधारणा व प्रसवपूर्व निदानयंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित कायदा २००३ पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे.

गर्भलिंग निदान प्रतिबंध, लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविणे आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कायद्याअंतर्गत तक्रार नोंदविण्यासाठी महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५ तसेच १०४ उपलब्ध आहेत. तसेच http://amchimulgimaha.in या संकेतस्थळावरही तक्रार नोंदविता येते. तक्रारदाराची माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते.

तक्रारीच्या आधारे कारवाई होऊन गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात येणार असून अशा प्रकारे स्त्री भ्रूणहत्या रोखण्यात यश आल्यास तक्रारदारास शासनामार्फत खबरी योजनेअंतर्गत १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

# स्वाधार योजनेअंतर्गत अर्जांच्या त्रुटीची पूर्तता करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत अनुसूचित जातीतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या तसेच समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे. ही योजना जिल्हा तसेच तालुका स्तरावर राबविण्यात येत असून, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अर्ज प्रक्रियेबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जे महाविद्यालय महानगर-पालिकेपासून पाच किलोमीटरच्या आतमध्ये व नगरपालिका नगर परिषद व नगरपंचायत तसेच तालुक्याच्या हद्दीत असलेले महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केले आहेत त्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन आपला यूजर आयडी व पासवर्ड वापरून अर्जाची सद्यस्थिती तपासावी. अर्ज सेंड बॅक झाल्यास संबंधित त्रुटीची पूर्तता आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करून १६ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करावी. अपलोड केलेली कागदपत्रे प्रत्यक्ष कार्यालयात आणण्याची आवश्यकता नाही.

# नांदेड 'आयटीआय'साठी ३०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन वसतिगृह मंजूर

## खा. रवींद्र चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी) –**शहरातील श्री गुरू गोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांच्या निवासाचा अनेक वर्षांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. खा. रवींद्र चव्हाण यांनी राज्य शासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संस्थेच्या आवारात ३०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे नवीन वसतिगृह बांधण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासनाने १७ कोटी ९४ लाख ५४ हजार ११२ रुपयांचा भरीव निधी मंजूर केला आहे.

नांदेड येथील आयटीआयचे जुने वसतिगृह अत्यंत जीर्ण झाल्याने आणि राहण्यायोग्य नसल्याने अनेक वर्षांपासून बंद होते. यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून तांत्रिक शिक्षणासाठी येणाऱ्या गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शहरात महागड्या दराने खासगी खोल्या भाड्याने घेऊन राहावे लागत होते. अनेकदा आर्थिक ओझं सहन न झाल्याने काही विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती.

ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन खासदार रवींद्र चव्हाण यांनी राज्याच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडे या प्रश्नाचा तातडीने निपटारा करण्याची आग्रही मागणी केली होती. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी संस्थेच्या आवारातच सुरक्षित आणि सुसज्ज निवारा असणे आवश्यक असल्याचे त्यांनी शासन दरबारी पटवून दिले. त्यांच्या या पत्राची आणि पाठपुराव्याची दखल घेत विभागाने या प्रस्तावाला अखेर मंजुरी दिली आहे.

या वसतिगृहासाठी १७ कोटी ९४ लाख ५४ हजार ११२ रुपये मंजूर झाले आहेत. यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

या निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यातील तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठा आधार मिळणार आहे. शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणात निवासाची अडचण येऊ नये, हाच आमचा मुख्य उद्देश होता. या नवीन वसतिगृहामुळे विद्यार्थ्यांचा आर्थिक ताण कमी होईल आणि ते आपल्या अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील, अशी प्रतिक्रिया खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यार्थी आणि पालकांमधून या निर्णयाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे. लवकरच या भव्य वसतिगृहाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात

# नवज्योत फाऊंडेशनतर्फे २७ ते २९ मार्च दरम्यान २० वे संस्कार शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी) –**सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या नवज्योत फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक विचारसरणी निर्माण करण्याच्या उद्देशाने २० वे संस्कार शिबीर दि. २७ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत कुसुम सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. इयत्ता ८ वी ते १२ वी मधील सुमारे ७०० विद्यार्थ्यांसाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जाणार आहे.

गेल्या २० वर्षांपासून नवज्योत फाऊंडेशनतर्फे समाजजागृती, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि युवकांच्या विकासासाठी करिअर मार्गदर्शन, निबंध स्पर्धा, रक्तदान शिबिरे आणि संस्कार शिबिरांसारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मिती, नेतृत्वगुणांचा विकास, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय मूल्ये रुजविण्यासाठी विविध व्याख्याने, संवादात्मक सत्रे तसेच सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचा समारोप रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजता होणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या अनुभवांचे आणि शिबिरातून झालेल्या सकारात्मक बदलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे निःशुल्क असून सकाळी ८.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत विविध सामाजिक व शैक्षणिक विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांचे मार्गदर्शन होणार आहे.

नांदेड येथील शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना या शिबिराचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन नवज्योत फाऊंडेशनचे संस्थापक सरदार नौनीहालसिंग जहागिरदार यांनी केले आहे.

# उमरीत श्रीसाई पालखी यात्रेकरूंना औषधी किटचे वाटप

**उमरी (प्रतिनिधी) –**श्रीक्षेत्र गोरठे (उमरी) ते श्रीक्षेत्र शिर्डी संतकवी दासगणू महाराज प्रतिष्ठान गोरठे (उमरी) च्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा करण्यासाठी उमरी येथून साईभक्त पायी ४२५ कि.मी.चा पायी चालत ही पदयात्रा शिर्डी येथे श्रीराम नवमीच्या आदल्या दिवशी पोहचणार आहे.

मंगळवार, दि. १० मार्च रोजी साई पालखीचे अध्यक्ष गोपाळ राठौर यांच्या नेतृत्वाखाली वाजतगाजत साईबाबा की जय हो, या भक्तीमय वातावरणात उमरी येथून शिर्डीकडे १३१ साई भक्तांची पदयात्रा निघाली आहे. उमरी शहरात जागोजागी साई पालखीचे स्वागत करण्यात आहे. सदर पदयात्रा १६ व्या दिवशी शिर्डी येथे पोहचणार आहे

या पायी यात्रेतील भाविकांसाठी मनोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान, रेणुका मेडीकल उमरी, भाजपा नांदेड लोकसभा ग्रामीण तालुका समन्वयक माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार, मनोविकास सामाजिक



सेवा प्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रूपेशकुमार श्रीरामवार व संचालक मंडळ यांच्या वतीने श्रीसाई पालखीचे स्वागत करत यात्रेकरूंना औषधी किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार, प्रा. रूपेशकुमार श्रीरामवार, भिमआर्मी एकता मिशन नांदेडचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर, फारुख बेग, डीआरयूसीसी मेंबर पारस दर्डा, गोपाळ राठोर, रामजी बेंबरे, अशोक मामीडवार, सुभाष पेरेवार, त्र्यंबक चिटमलवार, विवेक काचावार, गणेश पगलवाड, संदीप लापसेटवार, विनोद दर्डा, आनंद गोकावार, कृष्णा देशमुख, दत्तात्रय वारेवार, राजेश मुक्कावार, साईप्रसाद करपे, सादीक शेख, संदीप लांडगे व सर्व साई भक्त, गावकरी मंडळी उपस्थित होती.

# कांशीराम यांच्या जयंतीनिमित्त रविवारी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी) –** कांशीराम यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त नांदेड येथे रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेच्या वतीने समता परिषद कार्यालय, मयूर टॉकीज, नाईकनगर, नांदेड येथे आयोजित कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन युवा उद्योजक प्रवीण जेठेवाड यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भारतातील सहा हजार जातींना जोडून बहुजन समाजाची संकल्पना मांडणारे कांशीराम यांची प्रेरणा घेऊन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद ही अराजकीय सामाजिक संघटना आपली वाटचाल सुरु ठेवणार आहे. याबद्दल सविस्तर विचारविनिमय या शिबिरातून करण्यात येणार आहे. तसेच कांही पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी यूडीआईडी व आधार कार्ड ३१ मार्चपूर्वी जमा करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार राज्यातील दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ सुलभ व पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांचे वैशिष्ट्यपूर्ण ओळखपत्र यूडीआइडी कार्ड, ई-दिव्यांग प्रमाणपत्र व आधार कार्ड संबंधित योजनांशी संलग्न करणे आवश्यक करण्यात आले आहे.

राज्य शासनामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले युडीआइडी कार्ड व आधार कार्ड संबंधित कार्यालयात तात्काळ जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासन निर्णयानुसार दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे मासिक अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डीबीटी पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे योजनांचा लाभ अखंडपणे सुरू राहण्यासाठी सर्व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करणे अत्यावश्यक आहे.

# अंध मुलींच्या निवासी कर्मशाळेत जागतिक महिलादिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर येथील सावित्रीबाई फुले अंध मुलींची निवासी कर्मशाळा बटाळा रोड येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मनीषा माने यांनी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन केले. त्यानंतर प्रमुख अथिती व मान्यवरांचे अंध विद्यार्थिनींनी स्वागत गीताने स्वागत केले. यावेळी कर्मशाळेच्या व्यवस्थापकीय अधीक्षक लता शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. मनीषा माने यांनी आपल्या मनोगतामधून स्त्रीजीवनावर प्रकाश टाकून सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थिनींसाठी निशुल्क वैद्यकीय सेवा देण्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आपण समाजासाठी काहीतरी देण लागतो, आमचा मदतीचा हात आपल्यासोबत कायम असेल असे त्यांनी सांगितले.

कृषी विद्यालय भोकरच्या प्रा. रचना जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच माजी विद्यार्थिनी कु. काजल सुर्यतळे ही जानेवारी २०२९ पासून दृष्टीबाधित नोकरधारकांसाठी कॉम्पुटरचे online वर्ग चालवते. कल्पना कदम यांच्या हस्ते तिच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तिने आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना मन लावून अभ्यास करण्याचा संदेश दिला व जागतिक दिव्यांग दिनानिमित सर्व महिला-भगिनींना शुभेच्छा दिल्या. तद्नंतर सर्व महिला कर्मचाऱ्यांचे शाल, श्रीफळ देऊन संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर अंध विद्यार्थिनीने माँ तुझे सलाम या गीतावर नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली.

# एसआयआर मॅपिंग न केल्याबद्दल बीएलओंविरुद्ध राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेकडून निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्ह्यात सुरू असलेल्या एसआयआर मॅपिंगच्या कामात अनेक बुथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) योग्य पद्धतीने काम करत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी लेखी निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात सुरू असलेल्या एसआयआर मॅपिंग प्रक्रियेदरम्यान अनेक ठिकाणी बीएलओंकडून प्रत्यक्ष घरभेटी घेऊन मॅपिंग केले जात नाही. काही ठिकाणी नागरिकांना या प्रक्रियेबाबत माहिती दिली जात नसल्याने तसेच विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन एसआयआर मॅपिंगचे काम पारदर्शक व सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी. तसेच बेजबाबदारपणे काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना समज देऊन त्यांच्यावर आवश्यक ती कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या वेळी अब्दुल बशीर मजीद, अल्ताफ सानी, डॉ. हकीम खान, जुबेर खान, सादिक तांबोळी, सय्यद मुस्तफा, शेख नुरुद्दीन, मिर्झा नवाब बेग, रफी अहमद धनेगाव व सय्यद मुश्ताक आदी उपस्थित होते.

# महापालिका आयुक्तांनी घेतली गर्भाशय मुख कर्करोग लसीकरण मोहिमेची आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी) –**गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेसाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च रोजी पालिका मुख्यालयात टास्कफोर्स कमिटीची बैठक घेण्यात आली. या मोहिमेअंतर्गत शहरातील किशोरवयीन मुलींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



या बैठकीत महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरी आरोग्य केंद्र आणि शाळांमध्ये या लसीकरणाचे सुक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे सर्व लाभार्थी मुलींची नोंदणी केंद्र सरकारच्या 'यू-विन' पोर्टलवर डिजिटल पद्धतीने केली जाणार असून, पालकांमध्ये या लसीबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक आणि शाळांच्या मुख्याध्यापकांची मदत घेण्याच्या सूचना पालिका आयुक्तांनी दिल्या आहेत. ही लस महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये विनामूल्य उपलब्ध असणार आहे.

भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगापैकी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा दुसरा क्रमांक लागतो. हा आजार रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रतिबंधात्मक 'एचपीव्ही' लस देणे अत्यंत आवश्यक असून, ही लस प्रामुख्याने १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी (ज्या मुलींनी १४ वर्षे पूर्ण केली आहेत, पण १५ पूर्ण नाहीत) मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. 'गार्डासिल-४' ही लस या मोहिमेत वापरली जात आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार असून, योग्य वयात (९ ते १४/१५ वर्षे) लस घेतल्यास तो टाळता येतो. या मोहिमेसाठी पालकांची संमती अनिवार्य असून, लसीकरणानंतर लाभार्थ्यांच्या डाव्या हाताच्या करंगळीवर शाईने खूण केली जाणार आहे.

या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त निलेश सुनकेवार, उपआयुक्त अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठ्ठे, उपवैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा लसीकरण अधिकारी डॉ. बालाप्रसाद कुंटूरकर, डॉ.सुप्रिया पंडित, डॉ. मो. बदीयोद्दीन, डॉ. कल्याण पवार, डॉ. काझीम, शहर कार्यक्रम व्यवस्थापक सुहास सोनुले, बालाजी चव्हाण, आयएमएचे अध्यक्ष, डॉ. प्रल्हाद कोटकर, फॅक्सीचे डॉ.मिनल पाटील, लायन्यस कलबचे अध्यक्ष विश्वजीत राठोड, सचिव प्रविण अग्रवाल तसेच महिला व बालकल्याण विकास विभाग अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री दुर्गा पाठशाळेच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन

- धार्मिक व संस्कृत शिक्षणासाठी नवी इमारत उभारणार
- स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन

**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील श्री दुर्गा पाठशाळा यांच्या वतीने नव्या पाठशाळा इमारतीच्या बांधकामासाठी भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत श्रीदुर्गानगर, मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे भूमिपूजन स्वामी श्री गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते होणार असून, भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



श्री दुर्गा पाठशाळेने गेल्या अनेक वर्षांत धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या गुरुकुल विभागातून २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी वेद, शास्त्र, संस्कृत व पुराण या विषयांमध्ये सर्वोच्च पदवी प्राप्त करून समाजसेवेचे कार्य सुरू केले आहे. तसेच संस्थेच्या संस्कृत विभागातून १५०० पेक्षा अधिक शालेय विद्यार्थ्यांना संस्कृत आणि श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे शिक्षण देण्यात आले आहे.

संस्थेकडे विविध विषयांवरील ५०० हून अधिक पुस्तकांचे समृद्ध ग्रंथालय असून गेल्या ३१ वर्षांपासून प्राच्यविद्या महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. पाठशाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त अध्यापक व विद्यार्थ्यांनी २५ गावांमध्ये २५ भागवत सप्ताह आणि २५ विष्णुसहस्रनाम स्वाहाकार यशस्वीरीत्या पार पाडले आहेत.

सध्या पाठशाळेत १२ विद्यार्थी सामवेद, ऋग्वेद, स्मार्त, संस्कृत, पुराण व वेदांत शास्त्र या विषयांचे अध्ययन करीत आहेत. तसेच 'हिंदुत्व दर्शन' या प्रकल्पावर काम सुरू असून, आतापर्यंत ४ लाख २५ हजार श्लोकांचे परीक्षण पूर्ण करण्यात आले आहे. गुरुकुलातील अध्यापक व विद्यार्थ्यांनी सामवेद राणायनी शाखेच्या १०८ पारायणांचा संकल्प केला असून, त्याची संकल्पपूर्ती १२ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

याशिवाय भविष्यात धर्मदर्शन, साधना केंद्र, राष्ट्रदर्शन आणि प्रज्ञा जागृती अशा विविध उपक्रमांचीही योजना संस्थेच्यावतीने करण्यात आली आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# मॅट लिपस्टिक ओठांवरून निघत नसेल तर वापरा या सोप्या टिप्स...



**ओठांना लिपस्टिक लावल्यानंतर लुकमध्ये एक वेगळाच चार्म येतो. इतर मेकअप करत बसण्यापेक्षा अनेक महिला केवळ लिपस्टिक लावण्याला पसंती देतात. त्यातही ग्लॉसी, शिमरी अथवा अन्य लिपस्टिकपेक्षा मॅट लिपस्टिकला अधिक मागणी असते. ही लिपस्टिक ओठांवर अधिक काळ टिकते. पण मॅट लिपस्टिक काढताना मात्र महिलांना काही ब्रँड्‌सच्या बाबतीत खूपच त्रास होतो आणि ओठ काळे पडण्याचीही भीती असते. मग अशावेळी नक्की काय करावे आणि कसा त्रास होणार नाही याच्या काही सोप्या टिप्स. हा घरगुती उपाय करून तुम्ही तुमचे ओठ नैसर्गिक सुंदर ठेवण्यास मदत करू शकता.**

- नारळाचे तेल सोपा उपाय : प्रत्येकाच्या घरात नारळाचे तेल हे असतंच. तुम्हाला मेकअप रिमूव्हल मिळत नसेल तर नारळाचे तेल हा सोपा उपाय आहे. मॅट लिपस्टिक ओठांवरून काढण्यासाठी मेकअप रिमूव्हरदेखील कधी कधी अपयशी ठरते. पण यावर नारळाचे तेल अधिक गुणकारी ठरते. कापसावर नारळाचे तेल घ्या आणि मॅट लिपस्टिक ओठांवरून काढा. हे कोणताही त्रास न घेता पटकन लिपस्टिक काढण्यास फायदेशीर ठरते आणि त्याशिवाय नारळाच्या तेलाने ओठांना पोषणही मिळते.



- क्रिमी लिप बाम : मॅट लिपस्टिक काढण्यासाठी तुम्ही ओठांवर कोणत्याही पद्धतीचा क्रिमी लिप बाम लावू शकता. इतकंच नाही तर तुम्ही ब्रँडेड मॉईस्चराईजरचा वापर करूनही ही लिपस्टिक काढू शकता. हे क्रिमी लिप बाम लावा आणि मग मुलायम कपड्याने हलक्या हाताने ओठ पुसा. ओठांवरील लिपस्टिक पटकन निघून जाण्यास मदत मिळते.
- टूथब्रशची घ्या मदत : ओठांवरून लिपस्टिक काढल्यानंतरही बरेचदा मॅट लिपस्टिकचे डाग ओठांवर राहिलेले दिसून येतात. हे डाग काढण्यासाठी तुम्ही टूथ ब्रशची मदत घेऊ शकता. सॉफ्ट टूथब्रशच्या सहाय्याने तुम्ही हे डाग स्वच्छ करा. म्हणजे ओठ काळे पडणार नाहीत. तसंच टूथब्रशचा वापर केल्याने ओठ एक्सफोलिएटही होतात. हे करून झाल्यावर तुम्ही ओठांना हायड्रेटेड लिप बाम नक्की लावा.
- मॅट लिपस्टिकपूर्वी लावा लिप बाम : तुमची मॅट लिपस्टिक अधिक काळ टिकणारी असेल आणि लवकर निघत नसेल तर अशी शेड लावण्यापूर्वी तुम्ही ओठांना लिप बाम लावणे गरजेचे आहे. असे केल्याने ओठ मुलायम राहतील आणि लिपस्टिक काढतानाही त्रास होणार नाही. तसंच रात्री झोपण्यापूर्वी मेकअप काढणे अधिक गरजेचे असते. यासाठी तुम्हाला ओठ रगडावे लागणार नाहीत.
- ऑलिव्ह ऑईलही ठरते उपयोगी : नारळाच्या तेलाप्रमाणेच तुम्ही ऑलिव्ह ऑईलचाही उपयोग करून घेऊ शकता. नैसर्गिक तेल असल्याने तुमचे ओठ काळे पडणार नाहीत आणि मॅट लिपस्टिक लवकर निघण्यास याची मदत मिळेल. लिपस्टिक घालविण्यासाठी ओठ रगडणे योग्य नाही. ओठांना यामुळे नुकसान पोहचू शकते.

## तमन्नाचे ब्युटी सिक्रेट...

# दोन थेंब शुद्ध तुपामुळे खुलते सौंदर्य!



**अभिनेत्री तमन्ना भाटियाने सौंदर्य आणि बिनधास्त स्वभावाने सिनेरसिकांच्या हृदयात स्वतःचे स्थान निर्माण केलंय. तिच्या चाहत्यांच्या यादीमध्ये तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. विशेष म्हणजे ही अभिनेत्री स्किन केअर रुटीनमध्ये अत्यंत साध्या आणि नैसर्गिक उपचारांचा समावेश करते, यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. तमन्ना भाटिया आपल्या त्वचेचं डीप मॉइश्चराइझेन करण्यासाठी शुद्ध तूप आणि नारळाच्या तेलाचा उपयोग करते. तमन्नाचे सौंदर्य पाहिल्यानंतर ही अभिनेत्री ब्युटी पार्लरमधील महागड्या ट्रीटमेंटसाठी तास-न्-तास वेळ देत असावी, असे वाटू शकते. पण तिच्या ब्युटी केअर रुटीनमध्ये नैसर्गिक सामग्रींचा समावेश सर्वाधिक असतो. चला जाणून घेऊया तमन्ना भाटियाच्या सौंदर्याचे सीक्रेट...**

### ‘कंटाळवाणे असेल पण सत्य आहे...

आपल्या चमकदार त्वचेचं सीक्रेट सांगताना तमन्नाने स्पष्ट केलं होतं की, ‘मी जे काही शेअर करणार आहे, ती माहिती ऐकून तुम्हाला कदाचित कंटाळा आला असेल. पण जे सत्य आहे, तेच सांगतेय. चमकदार त्वचेचं पहिले सीक्रेट म्हणजे हाइड्रेट बॉडी. जास्तीत जास्त प्रमाणात पाणी प्या, डाएटमध्ये द्रवयुक्त पदार्थांचा समावेश करावा आणि हिरव्या भाज्यांचे नियमित सेवन करा. या सर्व गोष्टींमुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत मिळते’.

### चिरतरुण राहण्यास मदत करणाऱ्या गोष्टी

त्वचा चमकदार आणि उजळ ठेवण्यास कोणत्या गोष्टींचा उपयोग करणं तुला आवडतं, हा प्रश्न देखील तमन्नाला विचारण्यात आला होता. यावर तिनं उत्तर दिलं की, मी एक अशी व्यक्ती आहे जी केमिकल प्रॉडक्ट्‌सच्या मदतीने सौंदर्य मिळवण्याऐवजी घरगुती-नैसर्गिक उपचार करणं अधिक पसंत करते. हळद, चंदन पावडरचा उपयोग करणं मला जास्त आवडते. यामुळे त्वचेला उत्तम लाभ देखील मिळतात.





### माझे स्किन केअर रुटीन

त्वचेची देखभाल करण्यासाठी खासच गोष्टींचा उपयोग करावा, याची काहीही आवश्यकता नाही. मी नियमित CTM फॉलो करते; म्हणजेच क्लिंझिंग, टोनिंग आणि मॉइश्चराइझेशन या अतिशय बेसिक गोष्टी आहेत. पण याद्वारे त्वचेचं झालेलं नुकसान भरून निघण्यास मदत मिळते. प्रत्येक महिलेनं दिवसभरात अशा पद्धतीने आपल्या त्वचेची देखभाल करणं गरजेचं आहे.

### लहानपणी केला होता असा मेकअप

आपल्या बालपणीचा मजेशीर किस्सा देखील तमन्नाने सांगितला होता. मी चार किंवा पाच वर्षांची असेन, जेव्हा मी पहिल्यांदा स्वतःचा मेकअप केला होता. मी आईचे मेकअप बॉक्स उघडले आणि त्यातील आयशॅडो घेतले. एका पापणीवर हिरवा आणि दुसऱ्या पापणीवर निळा रंग्याचे आयशॅडो लावलं व झोपी गेले. झोपेतून उठल्यानंतर चेहऱ्यावर टनभर मेकअप पाहून ‘हिला नेमके झालंय तरी काय?’ अशी माझ्या आईची प्रतिक्रिया होती.




### मी या गोष्टींशिवाय जगू शकत नाही...

तमन्ना भाटियाला विचारण्यात आले होते की, असे कोणते प्रोडक्ट आहे, ज्याच्या वापराशिवाय तू जगू शकत नाही. यावर नारळाचे तेल असे उत्तर तमन्नाने दिलं. त्वचेची देखभाल करण्यासाठी फार पूर्वीपासून नारळाचे तेल आणि शुद्ध तुपाचा वापर करणे ही आपली परंपरा आहे. या सामग्रींचा उपयोग करणं मला आवडते. या दोन्ही गोष्टी पूर्णतः हर्बल आणि सुरक्षित आहेत. तसंच त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा देखील होतो. शुद्ध तुपाचे दोन थेंब घेऊन त्वचेवर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. २० मिनिटांनंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुऊन घ्यावा. तुम्हाला तुपाचा सुगंध आवडत नसेल तर फेस वॉशचा उपयोग करावा. पण हा उपाय करण्यापूर्वी आपल्या ओळखीच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यायला विसरू नका.

# कोथिंबीरीची पेस्ट लावल्याने त्वचा होते चमकदार!



**स्वयंपाकाची चव वाढवण्यासाठी कोथिंबिरीचा उपयोग आवर्जून केला जातो. कोथिंबिरीच्या चटणीशिवाय कांदा-बटाटा भजी खाण्याची मजाच येत नाही. पण स्वयंपाकाव्यतिरिक्त कोथिंबिरीचा स्किन केअर रुटीनमध्येही समावेश केला जाऊ शकतो, हे तुम्हाला माहिती आहे का? त्वचेची स्वच्छता करण्यासाठी, चेहरा चमकदार दिसण्यासाठीही कोथिंबिरीचा वापर करता येतो. कोथिबिंरीच्या फेस पॅकमुळे सुरकुत्या, मुरुम इत्यादी समस्या दूर होण्यास मदत मिळते. कोथिंबिरीतील औषधी घटकांमुळे त्वचेवरील मृत पेशींची समस्या दूर होते. तसंच त्वचेतील नवीन पेशींची निर्मिती होण्यासही मदत मिळते. जाणून घेऊया कोथिंबिरीचे फेस पॅक कसे तयार करायचे?**

### कोथिंबिरीचे फेस पॅक तयार करण्याची पद्धत

सामग्री : कोथिंबिरीची ताजी जुडी (आवश्यकतेनुसार), एक मोठा चमचा ताजे दही, एक चमचा बेसन. सर्वप्रथम कोथिंबिरीची पाने निवडा आणि मिक्सरच्या भांड्यामध्ये वाटून त्याची पेस्ट तयार करा. कोथिंबीर त्वचेसाठी अतिशय उपयुक्त मानली जाते. यामध्ये व्हिटॅमिन सी, अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. यामुळे त्वचा निरोगी राहते. तसंच वृद्धत्वाची समस्या आणि चेहऱ्यावरील डाग देखील कमी होतात. यातील पोषक घटकांमुळे सनबर्नची समस्या दूर होऊन त्वचेतील ओलावाही टिकवून ठेवण्याचे कार्य करतात.



### फेस पॅक एक पण फायदे अनेक

कोथिंबिरीची पेस्ट एक स्वच्छ वाटीमध्ये काढा. यामध्ये एक चमचा दही मिक्स करा. दह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते. यामुळे त्वचेवरील मृत पेशी काढण्यास मदत मिळते. तसंच त्वचेसाठी उपयुक्त असणाऱ्या फॅटी ॲसिड, प्रोटीन, व्हिटॅमिन आणि खनिजांचाही दह्यामध्ये मोठा साठा आहे. सर्वात शेवटी यामध्ये एक चमचा बेसन मिक्स करा. बेसनमुळे त्वचेवरील अतिरिक्त तेल कमी होण्यास मदत मिळते. यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. घट्ट पेस्ट तयार होईपर्यंत मिश्रण ढवळत राहा. फेस पॅक तयार झाल्यानंतर मान आणि चेहऱ्यावर लावा.

### टॅनिंग, जळजळ, लालसरपणा

कोथिंबिरीमध्ये अँटी- बॅक्टेरिअल, अँटी- सेप्टिक, अँटी- फंगल आणि अँटी- इंफ्लेमेटरी गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात. कोथिंबिरीचे फेस पॅक लावल्यास त्वचेवर जळजळ होणे, त्वचा लाल होणे, त्वचेला खाज होणे या समस्या कमी होण्यास मदत मिळते. उन्हाळ्यात बहुतांश जणांना टॅनिंगच्या समस्येचा सामना करावा लागतो. त्वचेला थंडावा मिळावा आणि त्वचा नैसर्गिक स्वरुपात उजळावी यासाठी आपण कोथिंबिरीच्या पेस्टचा उपयोग करू शकता.

### त्वचेला मिळतील दुप्पट फायदे

या फेस पॅकमुळे चेहऱ्याला थंडावा मिळेल. मुरुम, डार्क सर्कल, डाग, सनबर्न इत्यादी त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळेल. हवे असल्यास आपण यामध्ये गुलाब पाणी देखील मिक्स करू शकता. या फेस पॅकमुळे त्वचेला खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो.

### त्वचा राहील चिरतरुण

पॅक सुकल्यानंतर आपला चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा या फेस पॅकचा उपयोग करावा. पार्टीमध्ये जाण्यापूर्वी पार्लरमधील महागडी केमिकल ट्रीटमेंट करण्याऐवजी या होममेड फेस पॅकचा उपयोग करून पाहा. यामुळे चेहऱ्याची त्वचा मऊ होईल आणि त्वचा सैल देखील पडणार नाही.

# फळांच्या मदतीने घरीच करा बॉडी पॉलिशिंग!



**बदलत्या ऋतूनुसार आपल्या त्वचेची देखभाल करणं देखील अत्यंत गरजेचं असते. फेस पॅक, स्क्रबिंग यासह बॉडी पॉलिशिंग केल्यासही त्वचेला भरपूर लाभ मिळतील. आयुर्वेदिक - नैसर्गिक सामग्रींचा उपयोग करून घरच्या घरी बॉडी पॉलिशिंग केल्यास त्वचेवरील मृत पेशी, टॅनिंग यासारख्या समस्या हळूहळू दूर होण्यास मदत मिळते. घरच्या घरी बॉडी पॉलिशिंग करण्यासाठी आवश्यक असणारी सामग्री म्हणजे पिकलेली पपई. या फळातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत मिळेल. केवळ खबरदारी म्हणून हा उपाय करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण प्रत्येकाच्या त्वचेचा प्रकार एकसारखा नसतो. चला तर जाणून घेऊया सविस्तर माहिती...**

- बॉडी पॉलिशिंग क्रीम तयार करण्यासाठी लागणारी सामग्री : घरच्या घरी हर्बल बॉडी पॉलिशिंग क्रीम तयार करण्याची ही पद्धत अतिशय सोपी आणि प्रभावी आहे. ही क्रीम आपण एक आठवड्यापर्यंत फ्रीजमध्ये स्टोअर करून ठेवू शकता. सामग्री : पिकलेली पपई, बेसन, ऑलिव्ह ऑइल, मध, साखर. पॉलिशिंग क्रीम तयार करण्याची पद्धत : सर्व प्रथम पिकलेल्या पपईची एक मोठे स्लाइस घ्या. त्यावरील साल काढा आणि छोट्या आकारात पपई कापून मॅश करा. ही पेस्ट वेगळ्या वाटीमध्ये ठेवून द्या. यानंतर दुसऱ्यामध्ये वाटीमध्ये चार ते पाच चमचे साखर, दोन चमचे मध, तीन चमचे बेसन, दोन चमचे ऑलिव्ह ऑइल एकत्र घ्या. सर्व सामग्री नीट मिक्स करा. क्रीमप्रमाणे पेस्ट तयार होईपर्यंत पपईची प्युरी त्यामध्ये मिक्स करत राहा.
- कसा करावा क्रीमचा वापर : बॉडी पॉलिशिंग करण्यापूर्वी आंघोळ करणं आवश्यक आहे. जेणेकरून त्वचेवर जमा झालेले अतिरिक्त तेल आणि दुर्गंध स्वच्छ होईल. आंघोळ केल्यानंतर टॉवेलनं शरीर पुसून घ्या आणि बॉडी पॉलिशिंग क्रीम लावा. हे क्रीम लावल्यानंतर प्रत्येक अवयवाचा दोन मिनिटांसाठी मसाज करावा. यामुळे त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा होण्यास मदत मिळेल.
- त्वचेवर किती वेळ लावून ठेवावं क्रीम? : मसाज केल्यानंतर कमीत कमी १० मिनिटांसाठी क्रीम त्वचेवर लावून ठेवा. यानंतर टिश्यू पेपरच्या मदतीने त्वचा स्वच्छ करून घ्या. हवे असल्यास आपण आंघोळ देखील करू शकता. यानंतर संपूर्ण शरीरावर चांगले मॉइश्चराइझर किंवा कोरफड जेल लावणे आवश्यक आहे.
- त्वचेवर नैसर्गिकरित्या येईल तेज : हे बॉडी पॉलिशिंग क्रीम पूर्णतः हर्बल आहे. यामुळे तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आपण नियमित हा उपाय करू शकता. आठवड्यातून एकदा किंवा तिनदा आपण हा उपाय करावा. या क्रीममधील सर्व सामग्री नैसर्गिक असल्याने त्वचेला उत्तम लाभ मिळतात. केमिकलयुक्त ट्रीटमेंट करण्याऐवजी आयुर्वेदिक उपचारांचा स्किन केअर रुटीनमध्ये समावेश केल्यास दीर्घकाळासाठी लाभ मिळतील.

# चेहऱ्याच्या त्वचेची अशी होईल खोलवर स्वच्छता!

**टॅनिंग कमी करण्यासाठी आणि उन्हाळ्यात त्वचेवर नैसर्गिक चमक यावी, यासाठी बडिशेप अत्यंत उपयुक्त ठरू शकते. यातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेला थंडावा मिळतो आणि त्वचेतील पेशींची निर्मिती देखील जलदगतीने होण्यास मदत मिळते. बडिशेपच्या सुगंधामुळे मन आणि मेंदूला शांतता लाभते. या सुगंधामुळे तणाव कमी होतो. यातील औषधी गुणधर्मामुळे त्वचेचं सौंदर्य नैसर्गिकरित्या खुलते. तसंच मर्यादित स्वरुपात बडिशेपचे सेवन केल्यास पचनक्रिया देखील सुरळीत सुरू राहते. यामुळेच तन-मन आणि मेंदू या तिन्हीसाठी बडिशेप लाभदायक आहे.**

बडिशेपपासून अँटी-एजिंग फेस पॅक तयार करण्यासाठी लागणारी सर्व सामग्री तुमच्या स्वयंपाकघरात उपलब्ध असेलच. जाणून घेऊया पद्धत... साहित्य : चार चमचे बडिशेप, एक पिकलेले केळे, एक चमचा मध, गुलाब पाणी. सर्वप्रथम मिक्सरच्या भांड्यामध्ये बडिशेप वाटा आणि पावडर तयार करा. आपण एकाच वेळेस जास्त प्रमाणात पावडर तयार करून स्टोअर करू शकता. यानंतर टी-बॅग एक कप गरम पाण्यात बुडवून ठेवा. यानंतर केळ्याची साल काढा आणि केळे मॅश करा. मॅश केलेले केळे एका मोठ्या वाटीमध्ये घ्या आणि यामध्ये चार चमचे बडिशेपची पावडर मिक्स करा. यानंतर एक चमचा मध आणि गुलाब पाणी देखील मिक्स करावे. लेप तयार झाल्यानंतर चेहरा आणि मानेवर लावा. तसंच टी बॅग हलकीशी पिळा आणि २० मिनिटांसाठी डोळ्यांवर ठेवा. (टी-बॅग जास्त प्रमाणात गरम नसावी, हे कायम लक्षात ठेवा) पॅक लावून २० ते २५ मिनिटे झाल्यानंतर आपण चेहरा स्वच्छ करू शकता. यासाठी सर्वप्रथम डोळ्यांवरून टी बॅग काढा. चेहऱ्यावर पाणी शिंपडावे आणि गोलाकार दिशेने हलक्या हाताने त्वचेचा मसाज करून पेस्ट काढावी. असे केल्यास चेहऱ्यावरील डेड स्किनची समस्या दूर होऊन त्वचेची खोलवर स्वच्छता होण्यास मदत मिळेल. चेहरा पाण्याने स्वच्छ धुतल्यानंतर टॉवेलने पुसून घ्यावा. यानंतर कापसाच्या मदतीने चेहऱ्यावर गुलाब पाणी लावावे. गुलाब पाणी आपल्या चेहऱ्यावर स्किन टोनरप्रमाणे कार्य करते. यामुळे रोमछिद्रांमधील दुर्गंध स्वच्छ होण्यास मदत मिळते. तसंच त्वचेची खोलवर स्वच्छ देखील होते.

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# भूमिअभिलेख उपसंचालकाचे कार्यालय नांदेडला करावे

## आ. चिखलीकरांची महसूलमंत्र्यांकडे मागणी

**नांदेड(प्रतिनिधी)** – नव्याने प्रस्तावित असलेल्या भूमिअभिलेख उपसंचालकाचे कार्यालय नांदेडला करावे. नांदेड हे परभणी, हिंगोली, लातूर जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे उपसंचालकाचे कार्यालय नांदेड येथे करण्याची मागणी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा कंधार–लोहा विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नुकतीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन केली आहे.

नांदेड येथे भूमिअभिलेख जिल्हा कार्यालय व नांदेड तालुका कार्यालय कार्यान्वित आहे. राज्य शासनाने भूमिअभिलेख विभागाचे नव्याने आकृतीबंध मंजूर करण्यासाठी नवीन उपसंचालकाचे कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठवाड्यात नव्याने उपसंचालकाचे कार्यालय कार्यान्वित करण्याच्या हालचाली शासनस्तरावर सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार चिखलीकर यांनी



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन नांदेड हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे मराठवाड्यातील भूमिअभिलेख उपसंचालकाचे कार्यालय नांदेड येथे स्थापन केल्यास परभणी, हिंगोली, लातूर या जिल्ह्यातील लोकांना मध्यवर्ती ठिकाण म्हणून सोयीचे ठरणार आहे. दि. ९ मार्च रोजी आ. चिखलीकर यांनी महसूलमंत्र्यांची भेट घेऊन उपसंचालक कार्यालय नांदेड येथे करण्यात यावे, अशी मागणी लेखी पत्राद्वारे केली आहे. महसूलमंत्री बावनकुळे यांनी आ. चिखलीकर यांच्या मागणीचा विचार करू, असा त्यांच्या पत्रावर शेरा मारून महसूल विभागाला प्रस्ताव सादर करण्याच्या लेखी सूचना दिल्या आहेत.

नांदेड येथे नव्याने प्रस्तावित भूमिअभिलेख उपसंचालकाचे कार्यालय स्थापन करुन जिल्ह्याची व्याप्ती लक्षात घेऊन नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण असे दोन जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी द्यावी, अशी मागणीही आ. चिखलीकर यांनी महसूलमंत्र्यांकडे केली आहे.

# बसस्थानकातून पावणेचार लाखांचे दागिने लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातून प्रवाशी महिलेच्या पर्समधील जवळपास पावणेचार लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना मंगळवार, दि. १० मार्च रोजी दुपारी घडली आहे.

नांदेड शहरातील साफल्यनगर भागात राहणाऱ्या रोहिणी गिरीश माचेवाड (वय ४४) ह्या बाहेरगावी जाण्यासाठी मंगळवारी दुपारी शहरातील मुख्य मध्यवर्ती बसस्थानकात वाट पाहत थांबल्या होत्या. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा जवळपास पावणे चार लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेला. रोहिणी माचेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही सुध्दा बसस्थानकातून महिलांच्या पर्समधील दागिने चोरीच्या काही घटना घडल्या आहेत.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून नांदेड व लातूरमध्ये मटका अड्ड्यांवर धाडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील विमानतळ व लातूर जिल्ह्यातील देवणी भागात मटका अड्ड्यांवर छापे मारून पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाने ९४ हजार रुपयांच्या रोख रकमेसह अडीच लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड शहरात व लातूर जिल्ह्यात पोलीस पथकाची रवानगी केली होती.

या पथकाने बुधवार, दि. ११ मार्च रोजी नांदेड शहरातील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत आनंदनगर चौकातील ठाकरे कॉम्लेक्स व सांगवीतील हातोडा चौक या दोन ठिकाणी शटरमध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, ६९,४६०/- रुपयांची रोकड व ७२ हजार रुपयांचे (७) मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (२०) आरोपीतांना ताब्यात घेऊन, त्यांचेविरुध्द विमानतळ पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात येत आहे.

तत्पूर्वी, दि. १० मार्च २०२६ रोजी सायंकाळी लातूर जिल्ह्यातील देवणी येथील बसस्थानकासमोरील डोंगरे कॉम्प्लेक्स, मिनी मार्केट व बोरोळ चौक या ठिकाणांवरील ऑनलाईन लॉटरी मटका बुकीवर कारवाई करत, २५,३००/-रुपयांची रोकड, ४५ हजार रुपयांचे (०९) मोबाईल व व ६१,७००/- रुपयांचे लॉटरीचे साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणात एकूण (१३) आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुद्ध देवणी पोलीस ठाणे येथे गुरनं ५६/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार



कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास देवणी पोलीस ठाण्यातील पोहेकाँ. शौकत सय्यद यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही कारवायांत पोलीस पथकाने एकूण ९४,७६० रुपयांची रोकड, (१६) मोबाईल व साहित्य असा एकूण २,७३,४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेका प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१ ५० १०० १०० या ‘खबर’ हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# उरूसमध्ये बनावट नोटा चालविण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**माहूर (प्रतिनिधी)** – शहरातील सोनपीर बाबा दर्गाह येथे सुरू असलेल्या उर्स यात्रेदरम्यान विधी संघर्षितांकडून बनावट नोटा चालविण्याचा प्रयत्न उघडकीस आला आहे. माहूर पोलिसांनी केलेल्या कारवाईत एकूण १९ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी एका व्यक्तीस ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एका विधिसंघर्षित अल्पवयीन मुलाचा सहभागही समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दि. १० मार्च रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास माहूर पोलीस स्टेशनचे पोकॉ. संग्राम पवार, पो. कॉ. गजानन जाधव व पोकॉ. राठोड हे सोनपीर बाबा दर्गाह येथे सुरू असलेल्या यात्रेत पायी पेट्रोलिंग करत होते. यावेळी क्रॉस झुल्याजवळील तिकीट काऊंटरवरील महिलेने एका मुलाकडून बनावट नोट देऊन तिकीट घेत असल्याची माहिती पोलिसांना दिली. यावरून पोलिसांनी तत्काळ त्या मुलास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने माहूर वार्ड क्र. ७ येथील रहिवासी असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून ५०० रुपयांच्या ६ बनावट भारतीय चलनी नोटा, एकूण ३ हजार रुपये मिळून आले.

पुढील चौकशीत या नोटा त्याच्या आत्याचे पती यांच्या घरातून आणल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशावरून पोलिसांनी पंचांसमक्ष घराची झडती घेतली. यावेळी घरातील रॅकमधील कपड्याखाली ५०० रुपयांच्या ३३ बनावट नोटा, एकूण १६ हजार ५०० रुपये किंमतीच्या नोटा आढळून आल्या. पोलिसांनी पंचनामा करून सर्व बनावट नोटा जप्त केल्या असून, एकूण ३९ बनावट नोटा १९,५०० रुपये हस्तगत करण्यात आल्या.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १७९ व १८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शरद घोडके, पोहेकॉ. लक्ष्मण मेश्राम, पोकॉ. संग्राम पवार, पोकॉ. संघरत्न सोनसळे, होमगार्ड शेख गणी, दिलीप जाधव, पंकज मुरकुटे, उमेश भगत, एस. पी. भगत करीत आहेत.

# उद्यमी ग्लोबल फाउंडेशनच्यावतीने महिला उद्योजकता विकास शिबिराला उत्तम प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– उद्यमी ग्लोबल फाउंडेशन, गोदावरी फाउंडेशन व जेनियाक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त एकदिवसीय उद्योजकता विकास शिबीर नुकतेच पार पडले. या शिबिरात महिला व नवउद्योजकांना व्यवसायाच्या विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना राजश्री पाटील म्हणाल्या, आजच्या काळात महिलांनी आपले कौशल्य ओळखून बाजारातील गरजेनुसार व्यवसाय निवडला पाहिजे. व्यवसाय टप्प्याटप्प्याने वाढत असतो, त्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि नाविन्यपूर्ण विचार आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शॉप ॲक्ट, उद्यम नोंदणी, बँक लिंकेज, आर्थिक साक्षरता व क्षमता बांधणी या विषयांवर उद्यमी ग्लोबल फाउंडेशन काम करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

ऋषिकेश कोंढेकर यांनी उद्योजकता : काल, आज आणि उद्या या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, उद्योजकांनी स्वतःवर आत्मविश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या कामाला अर्थनिर्मितीचे स्वरूप द्यायचे असेल, वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा निर्माण करायची असेल आणि स्वावलंबी व्हायचे असेल तर महिलांनी उद्योजकतेकडे वळले पाहिजे.



आशिष राऊत यांनी स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वतःपुरता रोजगार निर्माण करणे म्हणजे स्वयंरोजगार, तर स्वतःचा व्यवसाय उभा करून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देणे म्हणजे उद्योजकता होय. इतरांपेक्षा आपल्या कामात वेगळेपण असणे आवश्यक असून, उद्योजकाच्या माहितीची भूक मोठी असली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रा. सुरेश कटकमवार यांनी व्यवसायात जिद्द, चिकाटी, स्वच्छता, संवाद कौशल्य आणि गुणवत्तेला विशेष महत्त्व असल्याचे सांगितले.

यावेळी कार्यशाळेत व्यवसायासाठी आवश्यक असलेली नोंदणी प्रक्रिया, नफा–तोटा ताळेबंद, बँक अकाउंट लिंकिंग, मार्केटिंग, ब्रँडिंग व गुणवत्तावाढ याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच व्यवसायासाठी भांडवल उभारणी व गुंतवणुकीसंदर्भातही माहिती देण्यात आली.

याप्रसंगी गोदावरी अर्बनचे संचालक प्रा. सुरेश कटकमवार, व्यावसायिक प्रशिक्षक ऋषिकेश कोंढेकर, स्टेट बँक ऑफ इंडियाचे ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षक आशिष राऊत, शिवधारा महिला पतसंस्थेच्या सचिव नीता कटकमवार, उपाध्यक्ष कीर्ती तगडपल्लेवार, संचालक रेवती रगटे, विजया बोरसे, प्रतीक्षा पतंगे, वैष्णवी पाटील, रंजना चव्हाण, उद्यमी फाऊंडेशनच्या ममता वानखेडे, आशा कलाने, रोहिणी भोयर, सावित्री संगेवार यांच्यासह अनेक उद्योजक महिला उपस्थित होत्या.

# वृद्ध दांपत्याला मारहाण करून लूट; दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –गंगाबेट शिवारात एका वृद्ध दांपत्यास अनोळखी ऊसतोड कामगारांनी जबर मारहाण करून जबरी चोरी केली. मात्र सायबर सेलच्या माध्यमातून सूक्ष्म तपास करत चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखा आणि नांदेड ग्रामीण पोलिसांच्या पथकाने अटक केली आहे. या चोरट्यांकडून वृद्ध महिलेच्या अंगावरील चांदीचे दागिने असा एक लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अनोळखी इसम तोंड बांधून हातात कत्ते व रॉड घेऊन द्रौपदाबाई पि. माणिकराव इनकर वय ६५ वर्षे, माणिका नागोबा इनकर वय ९० वर्षे दोघे रा. गंगावेट ता. जि. नांदेड यांना झोपेतून उठवून लाथाबुक्या, कत्याने व रॉडने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच द्रौपदाबाई पि. माणिकराव इनकर यांच्या हातातील



चांदीच्या पाटल्या व पायातील चांदीचे वाळे असे चांदीचे दागिने ज्याची किंमत १,१०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जबरीने घेवुन गेले अशी फिर्याद दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन अनोळखी चोरट्यांनी गंगाबेट शिवारातील एका आखाड्यावर वृद्ध दांपत्यांना जबर मारहाण करून लुटमार केली. या प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाचे चक्रे वेगाने फिरवून गोपनीय माहितीच्या आधारे विरेगांव ता. जि. जालना येथून रवी उर्फ मुंडल भास्कर शिंदे (वय २०, रा. विरेगांव ता. जालना) यास अत्यंत शिताफीने व सायबर सेलच्या मदतीने पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे यांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने वरील गुन्हा केल्याची कबुली दिली. एवढेच नाही तर सदर महिलेच्या अंगावरील चांदीच्या पाटल्या आणि अन्य दागिने पोलिसांना काढून दिले. त्याच्या सांगण्यावरून सदर गुन्ह्यातील दुसरा आरोपी भास्कर सायबा शिंदे (वय ५५, रा. विरेगांव ता. जालना) यास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकाने ताब्यात घेवून नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# बँक खात्यात पैसे नसताना एक लाख ११ हजारांचा धनादेश देऊन फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड येथील नरसी रस्त्यावर असलेल्या होम अप्लायन्सेस दुकानामधून फ्रिज, एलईडी टीव्ही, वॉशिंग मशीन, वातानुकुलित मशीन, सॅमसंग कंपनीचा टीव्ही असा एक लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल नेला. त्या बदल्यात बँक खात्यात पैसे नसताना धनादेश देऊन फसवणूक करणाऱ्या ग्राहकाविरुद्ध मुखेड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुखेड येथील राजू व्यंकटराव जाधव यांच्या दुकानातून बेरळी ता. मुखेड येथील महेश शेषराव बोईनवाड यांनी २१ ऑक्टोबर २०२४ ते २९ मार्च २०२५ च्या दरम्यान जाधव यांच्या दुकानामधून फ्रिज, एलईडी टीव्ही, सॅमसंग कंपनीची वाशिंग मशीन, एलजी एसी, सॅमसंग कंपनीचा टीव्ही असा एकूण एक लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल विकत घेतला. या बदल्यात ॲक्सिस बँक शाखा देगलूर येथील स्वतःच्या खात्यावर पैसे नसताना त्या खात्याचा धनादेश क्रमांक ० ७६ ९६२ चा शिवाजी जाधव यांच्या नावे देऊन फसवणूक केली. या प्रकरणी राजू जाधव यांच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक जावेद शेख करत आहेत.

# आशाताई कांबळे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथील रहिवासी आशाताई रमेशराव कांबळे यांचे बुधवार, दि. ११ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ४९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, जावई, एक मुलगा असा परिवार आहे.

नांदेड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांच्या त्या कनिष्ठ भगिनी होत. दिवंगत आशाताई रमेशराव कांबळे यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. ११ मार्च रोजी दुपारी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वीजचोरी प्रकरणी दहा जणांविरुद्ध पोलीस कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –विजेच्या थकीत बिलापोटी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांनी वीज तारांवर आकडे टाकून चोरून वीज वापरल्याप्रकरणी लोहा (जि. नांदेड) पोलीस ठाण्यात दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरून वापरलेल्या वीज बिलांसह दंडाच्या रक्कमेचीही आकारणी करण्यात आली आहे.

शेषराव हणमंतराव नाईक रा. जाहूर, ता.मुखेड यांच्याकडे महावितरणची ६२,७५० रुपयांची थकबाकी होती. थकबाकीपोटी त्यांचा यंत्रणेकडून वीजपुरवठा खंडित झाला होता. नाईक यांनी थकबाकीची रक्कम न भरताच परस्पर वीज तारेवर आकडा टाकून चोरून वीज वापर केला. त्याप्रकरणी शनिवार, दि. ७ मार्च रोजी लोहा पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करुन चोरुन वापरलेल्या विजेच्या बिलासह दंडही ठोठावण्यात आला आहे. त्याशिवाय माणिकराव विठ्ठलराव रा. पांडुर्णी, व्यंकट लक्ष्मण रा. कमळेवाडी, अनिल गोपीनाथ चव्हाण रा. वसंतनगर, यादव पिराजी टाळीकुटे रा. शिरुर दबडे, प्रकाश वाडीकर रा.बेळी, श्रीराम व्यंकटराव श्रीरामे रा.खैरका, शादूल जनोद्दीन रा. बेळी, माधवराव रामराव रा. वसंतनगर, हिरामण रामा गायकवाड रा.शिरुर दबडे ता. मुखेड यांनीही वीज बील भरणा न केल्याने त्यांचा पुरवठा बंद केला होता. परंतु या ग्राहकांनी आपले वीज बील न भरता अनधिकृतपणे परस्पर वीज जोडून घेऊन विजेची चोरी केल्याचे आढळून आले.

या प्रकरणी त्यांच्याही विरुध्द लोहा पोलीस ठाण्यात कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोहगाव शिवारात जुगार अड्ड्यावर धाड; ३ जुगारी जेरबंद, ७ पसार

## २ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहगाव शिवारात खैरगाव रस्त्यालगत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर रामतीर्थ पोलिसांनी धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तीन जुगाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून सातजण पसार झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून तब्बल २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी दिली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. ९ मार्च रोजी लोहगाव ते खैरगाव मार्गावरील शिवारात काही जण पत्यांवर मोठ्या रकमेचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती रामतीर्थ पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करत पोलिसांनी तत्काळ पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे व पोलीस कर्मचारी यांचे पथक तयार करून घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांचे पथक अचानक पोहोचताच तेथे आरोपी हे गोलाकार बसून पत्त्यावर पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असल्याचे आढळून आले. पोलिसांना पाहताच जुगाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला आणि काहींनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत शिवाजी गोविंदराव चव्हाण (रा. नायगाव), नागनाथ राम गायकवाड (रा. नायगाव) आणि महेश लक्ष्मण गंजलवाड (रा. मनसक्करगा, ता. देगलूर) या तिघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून चौकशी केली असता, घटनास्थळावरून पसार झालेल्या जुगाऱ्यांची नावे भगतसिंग उर्फ शेरसिंग (रा. नायगाव), जाकीर शेख (रा. खैरगाव), साईनाथ शिपाळे पाटील (रा. नायगाव), किरण घंटेवाड (रा. खैरगाव), अशोक पवार (रा. नायगाव), गणेश कोतावार उर्फ मास (रा. होटाळा) आणि व्यंकट शिंदे पाटील (रा. माजरंम) अशी असल्याचे उघड झाले.

पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम व जुगार साहित्य असा एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचा इशारा

रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार, मटका, अवैध धंदे कोणत्याही परिस्थितीत चालू देणार नाही, असा स्पष्ट इशारा सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी दिला आहे. अवैध धंद्यांविषयी कुणालाही माहिती मिळाल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी अशोक विठ्ठलराव यरपलवाड यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात दहा जुगाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पसार आरोपींचा शोध सुरू आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com